| महाराष्ट्र शासन |
|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे. |
| ई — निवीदा कार्यप्रणालीअंतर्गत निवीदा सुचना क्रं. १, |
| सन २०२५—२६ |

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे ४११००५ (दूरध्वनी क्रमांक ०२० — २५५३४७९९/२५५३६०२७) हे जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे आस्थापनेवरील अति. जिल्हा व सत्र न्यायालय, राजगुरुनगर—खेड, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राजगुरुनगर—खेड, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, वडगांव—मावळ, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वडगांव—मावळ तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालया वडगांव मावळ व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, दौंड, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, जुन्नर, तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालया जुन्नर आणि अति. जिल्हा व सत्र न्यायालय इंदापूर, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, इंदापूर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालया इंदापूर व दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पौड ता. मुळशी जि. पुणे आणि अति. जिल्हा व सत्र न्यायालय पिंपरी चिंचवड, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पिंपरी चिंचवड व शासकीय अभियोक्ता कार्यालय पिंपरी चिंचवड जि. पुणे, अति. जिल्हा व सत्र न्यायालय घोडनदी शिरुर, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, घोडनदी शिरुर व शासकीय अभियोक्ता कार्यालय घोडनदी शिरुर जि. पुणे या न्यायालय करीता बाहययंत्रणेद्वारे कंत्राटीपध्दतीने वाहन चालक, शिपाई, पुस्तक बांधणीकार, न्यायालय परिरक्षक, पहारेकरी, सफाईगार अशी भरावयाची एकूण ६९ पदे दोन वर्ष कालावधीसाठी ई—निवीदा पध्दतीने बाहययंत्रणेव्दारे आउटसोर्सिगच्या तत्वावर सेवासंविदा करारनामा करणेसाठी, ई—निवीदा प्रणालीद्वारे पात्र निवीदाधारकांकडून ऑनलाईन निवीदा मागवित आहेत. निवीदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिध्द केलेल्या अटी तांत्रिक स्पेसिफीकेशन व मागील परिमाण व दर हे बिड डाटा निवीदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

जिल्हा न्यायालय, पुणे आस्थापणेवरील न्यायालयीन कामकाजकरीता वाहन चालक, शिपाई, पुस्तक बांधणीकार, न्यायालय परिरक्षक, पहारेकरी, सफाईगार इ. पदे ही बाहययंत्रणेव्दारे संस्था/कंत्राटदारामार्फत उपलब्ध करून घेणे कामी इच्छुक निविदा धारकांकडून ई—निविदा मागविण्यात येत आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जिल्हा न्यायालय, पुणे.

...२

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| विभाग — १ | |
|---|---|
| १. निविदा स्वरुप :— | जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे आस्थापनेवरील अति. जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राजगुरुनगर—खेड, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालया वडगांव मावळ व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, दौंड, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय, जुन्नर, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय, इंदापूर व दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पौड ता. मुळशी जि. पुणे आणि अति. जिल्हा व सत्र न्यायालय पिंपरी चिंचवड, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पिंपरी चिंचवड व शासकीय अभियोक्ता कार्यालय पिंपरी चिंचवड जि. पुणे, अति. जिल्हा व सत्र न्यायालय घोडनदी शिरुर, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, घोडनदी शिरुर व शासकीय अभियोक्ता कार्यालय घोडनदी शिरुर जि. पुणे या न्यायालय करीता बाहययंत्रणेद्वारे कंत्राटीपध्दतीने वाहन चालक, शिपाई, पुस्तक बांधणीकार, न्यायालय परिरक्षक, पहारेकरी, सफाईगार अशी भरावयाची एकूण ६९ पदे आउटसोर्सिंगचे त—त्वांवर बाहय यंत्रणेव्दारे दोन वर्ष कालावधीकरीता उपलब्ध करुन देणे. |
| २. निविदा फॉर्म फी :— | रु. २०,०००/— ना परतावा |
| ३. अंदाजित रक्कम :— | रू. ४,५४,५१,००८/— |
| ४. बयाणा रक्कम :— | रु. २,००,०००/— |
| ५. कामाचा कालावधी :— | २ वर्ष |
| ६. सुरक्षा ठेव रक्कम :— | निविदा रकमेच्या ५ टक्के |
| ७. ई—निविदा विक्री व सादर :— | दिनांक ०२/०२/२०२६ सकाळी ११.००वाजेपासून करणेस सुरुवात दिनांक |
| ८. ई—निविदा स्वीकारणेचा अंतिम दिनांक :— | दिनांक १६/०२/२०२६ सायं १७.०० वाजेपर्यंत |
| ९. ई—निविदा उघडविण्याचा दिनांक :— | अ) तांत्रिक निविदा—लिफाफा क्र. १ जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे दि. १८/०२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता.<br>ब) व्यापारी/आर्थिक निविदा लिफाफा क्र. २ तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पात्र निविदा धारकांची आर्थिक निविदा उघडण्यात येईल. परंतू तांत्रिक अडचणी मूळे किंवा न्यायालयीन कामकाजामूळे यात बदल करण्याचे सर्व अधिकार हे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सो, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे. |
| प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,<br>जिल्हा न्यायालय, पुणे. ...३ | |

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

# विभाग — २

जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे आस्थापनेवरील विविध तालुका न्यायालय व कार्यालयात बाहययंत्रणेद्वारे कंत्राटीपध्दतीने वाहन चालक, शिपाई, पुस्तक बांधणीकार, न्यायालय परिरक्षक, पहारेकरी, सफाईगार अशी भरावयाची एकूण ६९ पदे आउटसोर्सिंगचे त—त्वांवर बाहय यंत्रणेव्दारे दोन वर्ष कालावधीकरीता उपलब्ध करुन घ्यावयाच्या आहेत त्यांची माहिती खालील तकत्यात

## बाहययंत्रणेद्वारे मनुष्यबळाव्दारे कंत्राटीपध्दतीने घ्यावयाच्या सेवा

| अ. क्र. | सेवा | राजगुरुनगर खेड न्यायालय | वडगांव मावळ न्यायालय | दौंड न्यायालय | जुन्नर न्यायालय | इंदापूर न्यायालय | पौड न्यायालय | पिंपरी चिंचवड न्यायालय | घोडनदी शिरुर न्यायालय | एकूण पदनिहाय संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन चालक | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | १ | ४ |
| २ | न्यायालय परिरक्षक | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ३ | पुस्तक बांधणीकार. | २ | ० | ० | १ | १ | ० | १ | १ | ६ |
| ४ | शिपाई | ० | ५ | २ | ५ | ५ | २ | ५ | ५ | २९ |
| ५ | पहारेकरी | २ | २ | १ | २ | २ | १ | २ | २ | १४ |
| ६ | सफाईगार | २ | २ | १ | २ | २ | १ | २ | २ | १४ |
| | एकूण | ८ | ९ | ४ | ११ | ११ | ४ | ११ | ११ | ६९ |

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जिल्हा न्यायालय, पुणे.

...४

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

## विभाग — ३

## अटी व शर्ती

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ०१. | ई—निविदेमध्ये भाग घेण्याकरीता संस्था/कंत्राटदारांना डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट काढणे आवश्यक आहे. |
| ०२. | ई—निविदा सुचनेमध्ये नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार ई—निविदा पुस्तिका फॉर्म (Form) खरेदी/डाउनलोड/बिड भरणे/बिड समाविष्ट करणे/सेवा शुल्क जमा करणे/बयाना/अनामत रक्कम जमा करणे ही सर्व प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे, यांची ई—निविदाकारांनी नोंद घ्यावी. |
| ०३. | ई—निविदा दोन लिफाफे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे (एक तांत्रिक आणि दुसरा व्यापारी). व्यापारी निविदा प्रपत्र क्र. ०१ व ०२ विहीत नमुन्यात असावी. |
| ०४. | कंत्राटदारास तो उपलब्ध करून देत असलेल्या कंत्राटी सेवांसाठी शासन निर्णय क्र. पदनि २५१२ प्र.क्र./१५७ का.१२, दि. २७/०२/२०१३ तसेच वेळोवळी निर्गमित होणारे शा. नि. दि. २६/०२/२०१३, ०६/०३/२०१३, १९/०३/२०१४, ०३/०९/२०१४ व २७/०१/२०१५ व २३/०२/२०१७ व ०९/०८/२०१७ व २७/०४/२०२२ व ०१/०९/२०२३ या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल सर्व शासन निर्णयातील (सदर शा. नि. शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.) निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे ई—निविदाकारावर बंधनकारक आहे यांची नोंद घ्यावी. |
| ०५. | प्रपत्र—१ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे. |
| ०६. | कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र, सेवा कराचे प्रमाणपत्र, मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र, पॅनकॉर्ड/ टॅन नंबर ई.एस.आय.सी.प्रमाणपत्र, पी.एफ. प्रमाणपत्र, प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र व कामगार आयुक्त कार्यालयाचे कमीत कमी ५० कंत्राटी मनुष्यबळास/कंत्राटी कर्मचारी पुरवठा करण्याबाबतचे प्रमाणपत्र, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, उदयम आधार नोंदणी प्रामणपत्र, एमएसएमई नोंदणी प्रमाणपत्र (एमएसएमई सुट नियमाप्रमाणे लागू राहील) इत्यादींच्या स्वाक्षांकित छायांकित प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या छायांकित प्रती न जोडल्यास त्यांचे निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येतील यांची नोंद घ्यावी. |
| ०७. | कंत्राटदार/संस्थे/कंपनी हे त्यांच्या वतीने नेमण्यात येणा—या कंत्राटी मनुष्यबळ/ कंत्राटी कर्मचा—यांची नांवे, त्यांचा पत्ता, फोटो व त्यांची चारित्र विषयक पोलीस व्हेरिफिकेशन प्रमाणपत्रे या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे यांची नोंद घ्यावी. |
| ०८. | सदर कामाकरीता संस्था/कंत्राटदार यांना देय मोबदला हा एक महिन्यांच्या कालावधी संपल्यानंतर देण्यात येईल काही तांत्रिक अथवा अपरिहार्य कारणास्तव निधी उपलब्ध नसल्यामुळे मोबदला देण्यास उशीर झाल्यास सदर रक्कमेवर व्याज देय राहणार नाही. तसेच देण्यात येणा—या मोबदला त्या त्या कंत्राटी कर्मचा—यास व मोबदल्यावर लागु असलेल्या नियमानुसार त्या त्या महिन्याचे सर्वप्रकारचे कर त्या त्या महिन्यात भरण्याची संपूर्ण जबाबदारी ही सर्वस्वी कंत्राटदार यांची राहील यांची नोंद घ्यावी. ...५ |

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| | |
|---|---|
| ०९. | कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांच्या कामाच्या वेळा कंत्राटदार हे कार्यालयाच्या गरजेनुसार ठरवतील तसेच सुट्टीच्या दिवशी देखील गरज भासल्यास काम करणे बंधनकारक आहे यांची नोंद घ्यावी. |
| १०. | न्यायालयीन इमारतीमधील विदयुत दिवे हे गरजेप्रमाणे चालू व बंद करण्याबाबतची जबाबदारी कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांवर राहील. |
| ११. | संस्था/कंत्राटदारास त्याने उक्त नमुद काम करणेसाठी नेमलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांना किमान वेतन अधिनियम कायदा १९४८ मधील वेळोवेळी निर्गमित होणा—या तरतुदी लागू राहतील व त्यानुसार वेतन, महागाई भत्ता, इतर भत्ते व सवलती लागु करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. तसेच नियुक्त केलेल्या कंत्राटी मनुष्यबळास/कंत्राटी कर्मचा—यांना द्यावयाची अतिकालीक (Overtime allowance) भत्यांची रक्कम ही *किमान वेतन कायद्यातील* तरतुदींपेक्षा कमी नसावी. |
| १२. | शासकीय वेळेनंतर कंत्राटी कर्मचा—यांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास, त्यांना अतिकालीक भत्ता (Overtime allowance) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता (Overtime allowance) देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल. (फक्त वाहन चालक याना लागू राहील.) |
| १३. | संस्था/कंत्राटदारामार्फत नियुक्त केल्या जाणा—या कर्मचा—यांना अदा करावयाची वेतनाची रक्कम ही किमान वेतन कायद्यातील तरतुदींनुसार कंत्राटदारांकडून कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + कामगार कल्याण निधी व उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम कर्मचा—यांना अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही कंत्राटदारावर बंधनकारक आहे. तसेच याबाबतचे लेखी पुरावे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सो, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांच्या कडे प्रत्येक महिन्यास सादर करणे बंधनकारक आहे. व त्याबाबतचे रु. ५००/— च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र देणे बंधनकारक राहील. |
| १४. | कंत्राटदाराने न्यायालयात कामाकरिता नेमलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांना किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदींप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्यांचे नांव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्या अनुषंगाने संस्था/कंत्राटदार यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी या कार्यालयास पुरवठा केलेल्या मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांच्या वेतनाबाबतच्या किंवा सेवेबाबतच्या कोणत्याही तक्रारी या कार्यालयाकडे येणार नाही यांची दखल घ्यावी. |
| १५. | दुस—या व चौथ्या शनिवार (कार्यालय बंद असेल) त्या दिवशी कंत्राटी मनुष्यबळ /कंत्राटी कर्मचा—यांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी दुस—या व चौथ्या शनिवार (कार्यालय बंद असेल) त्या दिवशी कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांना काम करण्यासाठी कार्यालयात कार्यालयामार्फत बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्यासाठी त्यांना वेगळा मोबदला मिळणार नाही. किमान वेतन कायदयातील तरतूदींप्रमाणे कंत्राटी कर्मचा—यांना दर आठवडयात एक रविवार भरपगारी सुटी देणे ही बाब कंत्राटदार यांचेवर बंधककारक राहील. ...६ |

(स्वाक्षरी)
**प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, पुणे.**

| | |
|---|---|
| १६. | सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांना कामावर बोलविण्यात आले नसल्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन कापून घेण्यात येवू नये. तथापी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यांना कामावर बोलविण्यात आले तर त्यांना कार्यालयात येणे बंधनकारक राहील व त्याऐवजी त्या कंत्राटी कर्मचा—यांस बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायदयानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल, कामगाराचे बदली रजेच्या/गैरहजेरीच्या कालावधीत दुसरा कर्मचारी उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही कंत्राटदाराची असेल व उपलब्ध करून देण्यात आलेल्या त्या कर्मचा—यांसाठी किमान वेतन कायदा व कामगार कायदयातील तरतुदींनुसार योग्य ते वेतन अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील. |
| १७. | संस्था/कंत्राटदार यांनी नेमणुक केलेले कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांना देण्यता येणा—या कर्तव्ये व जबाबदा—या नुसार काम करणे बंधनकारक राहील. तसेच सदर कर्तव्ये व जबाबदा—या यांचे मध्ये बदल करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश किंवा त्यांच्याव्दारे नियुक्त केलेले न्यायीक अधिकारी यांना राहतील आणि असे केलेले बदल कंत्राटदारास व कंत्राटदाराव्दारे नियुक्त केलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—यावर बधनकारक राहतील. |
| १८. | संस्था/कंत्राटदार यांनी नेमणुक केलेले कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांना या कार्यालयाच्या आदेशान्वये गणवेश, आयकार्ड पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी ही संबधीत कंत्राटदारावर असेल. |
| १९. | संस्था/कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटी सेवेबद्दल ते किंवा त्यांचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी यांना या कार्यालयाच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी नियुक्तीकरीता हक्क मागण्याचा अधिकार नाही यांची पूर्वी सुचना कंत्राटदार यांनी सबंधीत कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांना नियुक्ती पुर्वी लेखी स्वरूपात देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर असेल. |
| २०. | कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी हे कार्यालयात काम करतांना त्यांचे नजरेस ज्या काही बाबी येतील त्या कार्यालयीन बाबी आहेत, यांची जाणीव ठेवून त्या संबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवतील तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकाराचा हस्तक्षेप होणार नाही याबाबतची दक्षता घेतील. गोपनियतेचा भंग झाल्यास सदरचा करार अंशतः अथवा पुर्णतः रद्द करण्यात येईल. |
| २१. | कंत्राटदार हे त्यांच्या वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा—यांकडून दररोज वक्तशीरपणे व नियमितपणे या कार्यालयाचे काम करवून घेतील. त्यांची कार्यालयातील वर्तणुक व कांमाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायीत्व हे कार्यालयाच्या सर्व हितसंबंधाचे रक्षण करणेचे राहील. तसेच कंत्राटदाराचे वतीने नेमण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा—यांकडून उपद्रव होणार नाही यांची दक्षता घेवून काम करून घेतील तसेच कर्मचारी अयोग्य व अपात्र असल्याचे अथवा त्यांचे अशोभनीय वर्तन असल्याचे आढळल्यास त्या कर्मचा—यांस पुर्वसुचना नदेता काढून टाकणेसंबंधीचे आदेश देण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील. |
| २२. | कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचा—याचा योग्य तो विमा उतरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. कामावर असतांना पुरवठा केलेल्या उमेदवारास कोणतीही प्रकारची इजा / अपघात झाल्यास किंवा मनुष्यहानी झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. |

...७

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| | |
|---|---|
| २३. | कंात्राटासंबंधी कोणताही विवाद निर्माण झाल्यास हे कार्यालय नेमतील ते मा. न्यायाधीश लवाद म्हणुन काम पाहतील व १९९६ च्या लवादाच्या कायदयानुसार या विवादाबाबत त्यांचा निर्णय अंतिम असेल. |
| २४. | कंत्राटदारने नेमलेल्य कंत्राटी कर्मचा—यांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे या कार्यालयास आढळून आल्यास कंत्राटदारास देण्यात येणा—या मोबल्यामधून सदर रक्कम वसुल करण्यात येईल. |
| २५. | कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचारी व या कार्यालयामध्ये, मालक व कर्मचारी असे संबंध राहणार नाहीत. कंत्राटदार हे पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६, एम्लॉई प्राव्हीडंट फंड ॲक्ट, पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट १९७२, वर्क्समन कॉम्पेन्सेशन ॲक्ट, वर्क्स कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट, सेल्स टॅक्स ॲक्ट, मिनिमम वेजेस ॲक्ट १९४८, इंटस्टीय डिसप्युट ॲक्ट १९४७ कॉन्ट्रॅक्ट लेबर (Prohibition & Regulation) ॲक्ट १९८६ या व इतर सर्व कामगार कायद्यांच्या तरतूदींचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच सदरचे काम करण्यासाठी कायदयानुसार लागणारे सर्व परवाने असणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. |
| २६. | कंत्राटदारास अदा करावयाचे देयक प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत उक्त नमुद तालुका आस्थापनेवर काम योग्य रितीने व समाधानकारक केल्याबाबतचे तेथील मा. न्यायीक अधिकारी यांच्या स्वक्षरीचे प्रमाणपत्र किंवा मा. न्यायीक अधिकारी यांच्या आदेशान्वये संबंधीत न्यायालयातील अधिक्षक/सह अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र मा. जिल्हा न्यायालय, पुणे येथे जमा केल्यावरच देयकाबाबतची पुढील कार्यावाही करण्यात येईल. |
| २७. | जिल्हा न्यायालयाच्या आखात्यारितील तालुका न्यायालयात सर्व प्रकारची आपणाव्दारे कामे कंत्राटी पध्दतीने करून घेतल्याबाबतचा मासिक अहवाल असमाधानकारक असल्यास व त्याची लेखी अथवा तोंडी निर्देश देऊन ही योग्य दखल न घेतल्यास सदर कसुर हा अक्षम्य असेल व त्या कारणाने करार रद्द बादल करण्याचे अधिकारी व कंत्राटदारास देण्यात येणा—या मोबदला देण्याचे किंवा मोबदल्यातून काही रक्कम वजाती करण्याचे संपूर्ण अधिकार हे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांचे आहेत यांची नोंद घ्यावी. |
| २८. | कंत्राटदार यांना एकूण कंत्राटाच्या रक्कमेच्या ०५ टक्के रक्कमेची फक्त राष्ट्रीयकृत बॅकेची गॅरंटी ३० महिन्या करीता सुरक्षा ठेव म्हणून या कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे, तसेच त्यांनी कराराच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास, मुदत ठेव/बॅक गॅरंटीची रक्कम जप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. सेवा कराराच्या दरम्यान कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास सदर करार नोटीस देवून रद्द करण्यात येईल आणि सदरचे काम इतर दुस—या संस्थे कडून कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व त्याच्या खर्चाने दुसरी व्यवस्था होईपर्यंत करून देणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. |
| २९. | कंत्राटदार यांनी बयाना/अनामत रक्कम (Earnest Money) ई—निविदा रक्कमेच्या कमीत कमी रक्कम रूपये २,००,०००/— Net Banking व्दारे जमा करावी. |
| ३०. | सर्व ई—निविदा या नियोजित तारखेस व वेळे उघडण्यात येतील. परंतू तांत्रिक अडचणी मूळे किंवा न्यायालयीन कामकाजामूळे यात बदल करण्याचे सर्व अधिकार हे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सो, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांचे राहतील. |
| ३१. | फक्त ई—निविदा किंवा बयाना/अनामत रक्कम जमा केली म्हणुन कंत्राटवर हक्क सांगता येणार नाही. ...८ |

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| | |
|---|---|
| ३२. | कंत्राटदार यांनी त्यांच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांना प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मागील महिन्याचे मानधन अदा करणे बंधनकारक राहील तसेच कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता संबंधित कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचाराच्या नावाने Account Payee Cross (रेखांकित धनादेश) व्दारे किंवा ई.सी.एस. व्दारे/एन.ई.एफ.टी व्दारे संबंधित कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचाराच्या बॅक खात्यात जमा करतील. |
| ३३. | कंत्राटदाराने त्यांच्या मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांना दिलेल्या वेतनाच्या इतर भत्यांच्या Account Payee Cross (रेखांकित धनादेश) ची छायांकित प्रत किंवा ई.सी.एस.व्दारे/एन.ई.एफ.टी व्दारे वेतनाची रक्कम व भत्याची रक्कम कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारांच्या बॅक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बॅक अधिका—यांच्या स्वाक्षरीचे विवरणपत्र (Bank Statement) या कार्यालयात सादर करणे बंधनकारक असेल. |
| ३४. | कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांच्या संपूर्ण नावासह किमान वेतन कायद्यातील तरतुदींनुसार किमान वेतन + विशेष भत्ता + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + कामगार कल्याण निधी व उपदान इत्यादी मिळून होणा—या रक्कमेचे विवरणसह वेतन प्राप्त झाल्याचा अहवाल या कार्यालयाकडे मासिक नियमितपणे सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल. |
| ३५. | कंत्राटदार हे त्यांच्या मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांचे दैनंदिन हजेरी ही संबधीत न्यायालयातील अधिक्षक/सह अधिक्षक किंवा मा. न्यायिक अधिकारी आदेशीत करतील त्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कडे नोंदवितील व संबधीत अधिकारी सदर हजेरी पत्रकाचा अहवाल जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांच्या कडे पाठवितील. सदर अहवालातील हजेरीनुसार देयक अदा करतील. |
| ३६. | जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे आणि अंतिम मंजूरी नुसार निवड झालेला निविदाधारक यांच्याती सेवा—संविधा करारनामा हा दोन वर्षा करीता राहीत परंतू कंत्राटदार आणि कंत्राटी मनुष्यबळ/कर्मचारी यांच्या मधील नियुक्तीचा करारनामा हा प्रत्येक कंत्राटी मनुष्यबळ/कर्मचारी करीता ११ महिने पेक्षा जास्त असताकामा नये. तसेच प्रत्येक कंत्राटी मनुष्यबळ/कर्मचारी नियुक्ती करारानाम्याची प्रत या कार्यालयस देणे आवश्यक आहे. |
| ३७. | उपरोक्त सर्व अटी व शर्तीचे तसेच वेळोवेळी कंत्राटी मनुष्यबळ/कंत्राटी कर्मचारी यांच्या बाबत महाराष्ट्र शासन व्दारे निर्गमित करण्यात येणारे सर्व शासन निर्णय हे संबधीत कंत्राटदार यांच्या वर बंधनकारक राहतील. |
| ३८. | उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त इतर अटी व शर्ती समाविष्ठ अथवा बदल करण्याचा सर्व अधिकार करार कालावधी पर्यंत हा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सो, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे यांच्याकडे राहील व तो संबंधीत कंत्राटदारवर बंधनकारक असेल. |
| ३९. | कंत्राटदार यांनी कंत्राट कालावधीत उपरोक्त सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील व त्याचे पालन करेल असे हमीपत्र रु. ५००/— च्या स्टॅम्प पेपरवर लिहून दयावे लागेल. |

दिनांक.:— / /२०२६ — प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
ठिकाण :— पुणे. — जिल्हा व सत्र न्यायालय,पुणे.

...९

(signature) २१/०१/२०२६
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

## —: ई — निवीदेचे वेळापत्रक :—

| | |
|---|---|
| ई—निवीदा विक्रीचा कालावधी | **दि. ०२.०२.२०२६ वेळ सकाळी ११:०० ते दि. १६.०२.२०२६ वेळ सायंकाळी १७:०० पर्यत.** |
| ई—निवीदा सादर करण्याचा दिनांक | **दि. ०२.०२.२०२६ वेळ सकाळी ११:०० ते दि. १६.०२.२०२६ वेळ सायंकाळी १७:०० पर्यत.** |
| निवीदा पूर्व बैठक दिनांक, वेळ व ठिकाण | **दि. ०६.०२.२०२६ वेळ सकाळी १०:३० वाजता, जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे.** |
| तांत्रिक/व्यापारी ई—निवीदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण | **दि. १८.०२.२०२६ वेळ सकाळी १०:३० वाजता, जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर, पुणे.** |

| टिप :— | |
|---|---|
| १) | उपरोक्त ई निवीदा सुचनेतील अधिक माहितीकरिता इच्छुक निवीदाकारांनी संकेतस्थळ WWW.mahatenders.gov.in मध्ये पहावे. |
| २) | ई निवीदेचे वेळापत्रक, अटी व शर्तीसंबंधी अधिक माहिती संकेतस्थळ WWW.mahatenders.gov.in मध्ये पहावे. |
| ३) | ई — निवीदा सूचना WWW.mahatenders.gov.in मध्ये दिनांक दि. ०२.०२.२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दिनांक १६.०२.२०२६ रोजी सायंकाळी १७:०० वाजे पर्यत उपलब्ध होतील. |
| ४) | पुरवठादारांना ई — निवीदेबाबत काही अडचणी आल्यास Helpdesk Nos. Tel. No. 0120-4493395, 0120-4001 002, 0120-4001 005, वर संपर्क साधावा किंवा जिल्हा न्यायालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक २५५३१६४७ आणि २५५३४७९६ वर संपर्क साधावा. |
| ५) | अनामत रक्कम व टेंडर फी ऑनलाईन प्रणालीने स्विकृत होणार आहे. सदर को—या निवीदा संचाची किंमत रक्कम रुपये २०,०००/— राहील. |
| ६) | सदर अनामत रक्कम/बयाना रक्कम ही रुपये २,००,०००/— एवढी राहील, सदर अनामत रक्कम ही ऑनलाईन प्रणालीने स्विकृत होणार आहे. |
| ७) | इतर अटी व शर्ती ई—निवीदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील, सदर कामाची ई—निवीदा कोणतेही कारण न देता रदद् करण्याचे अधिकार शासन/सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. |
| ८) | या कार्यालयास सादर करावयाच्या तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्राची माहिति हि .pdf format मध्ये सादर करावी. |
| ९) | तसेच या कार्यालयास सादर करावयाच्या व्यापारी निविदेची माहिति हि .xls format मध्ये सादर करावी. |

दिनांक.:— / /२०२६
ठिकाण :— पुणे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जिल्हा व सत्र न्यायालय,पुणे.

...१०

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

## निविदा अर्ज

**निविदा मागविणा—या कार्यालयाचे नांव : जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.**

| | |
|---|---|
| कामाचे स्वरुप | आउटसोर्सिंगचे त—त्वांवर वाहन चालक, शिपाई, पुस्तक बांधणीकार, न्यायालय परिरक्षक, पहारेकरी, सफाईगार पदे दोन वर्षे कालावधीसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,५४,५१,००८/— (रक्कम रुपये चार कोटी चोपन लाख एक्कावन हजार आठ फक्त) पर्यंत काम सेवासंविदा करारान्वये करुन घेणेबाबत. |
| निविदेचा क्रमांक | ई—निविदा क्रमांक १/२०२५—२०२६. |
| कार्यालयाचे नांव | जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे. |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचे नांव | |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा नोंदणी क्रमांक | |
| कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचा जीएसटीक्रमांक | |

...११

(सही)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

**प्रपत्र—१**

## निविदा क्रमांक १/२०२५—२०२६

## (तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये संस्थेने सादर करावयाची कागदपत्रे)

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | ई—निविदा कंत्राटदाराचे / संस्थेचे /कंपनीचे नांव | | |
| २. | ई—निविदाकाराकडे सदर कामाचा सद्य स्थितीत शासकीय कार्यालयांत तत्सम सेवा पुरविण्याचे अनुभव प्रामणपत्र जोडणे आवश्यक. | | |
| ३. | ई—निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र तसेच चालु महिन्यातील अद्यावत पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दाखल करावे. | | |
| ४. | ई—निविदाकाराने खालील बाबींची पूर्तता केली आहे काय ? | | |
| ५. | कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत | | |
| ६. | कंपनी/संस्थेचे जीएसटी कराच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत | | |
| ७. | कंपनी/संस्थेचे मागील तीन आर्थिक वर्षाच्या आयकर प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती. (सन २०२२—२०२३, २०२३—२०२४, २०२४—२०२५ ) | | |
| ८. | निविदाधारकाची मागील ३ प्रत्येक आर्थिक वर्षात उलाढाल रक्कम रु. ३,००,००,०००/— अक्षरी रु. तीन कोटी मात्र किंवा त्यापेक्षा जास्त असले बाबतचे चार्टर्ड अकाउंटंट याचे कडून प्रामाणित केलेले प्रमाणपत्र सही शिक्का व UDIN नंबर सह जोडणे आवश्यक. | | |
| ९. | कंपनी/संस्थेचे पॅन/टॅन कार्डची छायांकीत प्रत. | | |
| १०. | कंपनी/संस्थेचे ई.एस.आय.सी. प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. | | |
| ११. | कंपनी/संस्थेचे पी. एफ. प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. | | |
| १२. | कंपनी/संस्थेचे प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. | | |
| १३. | कंपनी/संस्थेचे एमएसएमई नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. | | |
| १४. | बयाना/अनामत रक्कम भरली आहे काय? त्याची प्रत जोडावी. | | |
| १५. | सहकारी संस्था असल्यास सदरची ही निविदा भरणेबाबत मा. सहा. निबंधक सह. संस्था यांचे अनुमती पत्र. | | |
| १६. | रु. २,००,००,०००/— अक्षरी रुपये दोन कोटी मात्र राष्ट्रीयकृत/शेडयुल/जिल्हा बॅकेचे सॉल्व्हन्सी प्रामणपत्र मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, पुणे यांचे नावाचे असणे व निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. स्विकृत निविदाधारकाने मुळ सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र कार्यारंभ आदेशापूर्वी करारनामा करणतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील. | | |
| १७. | गुणवत्ता सेवा प्रमाणपत्र ISO 9001-2015 जोडणे आवश्यक. | | |
| १८. | शासकीय संस्थेत तसेच तत्सम सेवेचे काम केल्याबाबत चे कार्यादेशाची प्रत जोडावी. | | |
| १९. | निविदाधारककाकडे किमान १०० कामगार पुरविण्याचा लेबर परवाना असणे आवश्यक असून, त्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी. | | |
| २०. | निविदाधारकास /संस्थेस शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकले नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. | | |
| २१. | निविदाधारकाने निविदा मधील नमूद केलेल्या सर्व माहिती व अटी व शर्तीचे पालन करीन या आशयाचे हमीपत्र रु. ५००/—च्या स्टॅम्प पेपरवर जोडणे आवश्यक आहे. | | |

अ.क्र. १ ते २१ अनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफामध्ये सादर केले करण्यात यावे. तसेच अनावश्यक कागदपत्रे जोडण्यात येवु नये. अपुर्ण कागदपत्रे असलेल्या कंपनी/संस्थाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार स्विकार्य राहणार नाही.

दिनांक:— ई — निविदाकाराचे नाव, सही व शिक्का

...१२

...अध्यक्ष,

जिल्हा ..., पुणे.

# प्रपत्र — क्र. २ अ

## निविदा क्रमांक ०१/२०२५—२०२६

## (आर्थिक लिफाफा क्र. २ मध्ये संस्थेने सादर करावयाचे दरपत्रक)

| | |
|---|---|
| निविदा मागविणा—या कार्यालयाचे नांव | जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे |
| कामाचे स्वरुप | जिल्हा न्यायालय, पुणे यांचे आखत्यारीमधील तालुका न्यायालय करीता (वाहन चालक, परिरक्षक, पुस्तक बांधणीका, शिपाई, पहारेकरी, सफाईगार इ.) एकूण ४७ पदे बाहययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने २ वर्षे कालावधीकरीता उपलब्ध करुन घेणे. |
| निविदा क्रमांक | ०१/२०२६ |
| कंत्रादाराच्या संस्थेचे/ कंपनीचे नांव | |
| कंत्रादाराच्या संस्थेचे/ कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| कंत्रादाराच्या संस्थेचे/ कंपनीचा संपर्क दुरध्वनी | |
| कंत्रादाराच्या संस्थेचे/ कंपनीचा नोंदणी क्रमांक | |
| कंत्रादाराच्या संस्थेचे/ कंपनीचा सेवाक क्रमांक | |
| कंत्रादाराच्या संस्थेचे/ कंपनीचा जीएसटी नोंदणी क्रमांक | |

| निविद क्रमांक | न्यायालयाचे नाव | उपलब्ध करुन घ्यावयाच्या सेवा | दरमहा वेतन | सेवा शुल्क (%) | सेवा शुल्क (रु.) | एकूण रक्कम रुपये स्तंभ ४+६ | जीएसटी (१८%) स्तंभ ७ वर (१८%) | एकूण रक्कम रुपये ७+८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१/२०२६ | जिल्हा न्यायालय, पुणे यांचे आखत्यारीमधील तालुका न्यायालय | वाहन चालक | | | | | | |
| | | न्यायालय परिरक्षक | | | | | | |
| | | पुस्तक बांधणीकार | | | | | | |
| | | शिपाई | | | | | | |
| | | पहारेकरी | | | | | | |
| | | सफाईगार | | | | | | |

कंत्राटदाराचे नांव, सही शिक्का दिनांक

(सुचना वरील दर पत्रक हे आर्थिक लिफाफा क्र. २ मध्ये अपलोड करावे.)

टिप :— १. सदर दर दर्शविताना एक महिन्याचे दर्शविण्यात यावे.
२. कंत्रादार संस्था/कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देताना महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या शासन निर्णया मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.

...१३

(signature)
[illegible],
जिल्हा [illegible], पुणे.

## प्रपत्र — क्र. २ ब

## निविदा क्रमांक ०१/२०२५—२०२६
## (आर्थिक लिफाफा क्र. २ मध्ये संस्थेने सादर करावयाचे दरपत्रक)

| अ.क्र. | पद | अतिकालीक भत्याची रक्कम रुपये (प्रति तास) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | वाहन चालक | |
| २ | न्यायालय परिरक्षक | |
| ३ | पुस्तक बांधणीकार | |
| ४ | शिपाई | |
| ५ | पहारेकरी | |
| ६ | सफाईगार | |

कंत्राटदाराचे नांव, सही शिक्का दिनांक

अ) स्तंभ क्रमाक ३ मधील माहिती कंत्राटदारांनी भरावयाची आहे.

ब) प्रपत्र — २ ब मध्ये कंत्राटदाराने स्तंभ २ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पदासाठी प्रति तास किती रकमेची मागणी करण्यात येत आहे ते स्तंभ रकान ३ मध्ये नमुद करावे.

क) कंत्राटदाराने नमुद केलेली वेतनाची व अतिकालीक भत्याची रक्कम किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी नसावी.

ड) प्रपत्र — २ (अ) व प्रपत्र —२ (ब) कंत्राटदारांनी लिफाफा क्र. २ मध्ये दर नमुद करुन अपलोड करावे.

(signature)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

## परिशिष्ट १

## शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा

जिल्हा न्यायालय, पुणे यांचे आखत्यारीमधील तालुका न्यायालय करीता (वाहन चालक, परिरक्षक, पुस्तक बांधणीका, शिपाई, पहारेकरी, सफाईगार इ.) एकूण ४७ पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणीक पात्रता व वयोमर्यादा ही आस्थापना विभाग, जिल्हा न्यायालय, पुणे यांचेकडील पत्र क्र. आस्था.४/५७५४/२०२५ दि. ०७/०७/२०२५ अन्वये पुढील प्रमाणे

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | वाहन चालक | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (SCC) उर्त्तीर्ण.<br>ब) मोटार वाहन अधिनियम १९८८ (क्रमांक ५९ सन १९८८चा) अन्वये आवश्यक असलेले जडवाहन, मोटारगाडी चालविण्याचा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा परवाना ( वाहन चालविण्याची वैध परवाना) धारण केलेला असणे आवश्यक आहे. |
| २. | न्यायालय परिरक्षक | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (SCC) उर्त्तीर्ण. |
| ३. | पुस्तक बांधणीकार | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्ष इयात्ता ७ वी उर्त्तीर्ण.<br>ब) पुस्तक बांधणीकाराच्या कामाचे सरकारी प्रशिक्षण घेतलेले किंवा कोणत्याही प्रेस मध्ये सदरली कामाचा ३ वर्षाचा अनुभव. |
| ४. | शिपाई | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्ष इयात्ता ७ वी उर्त्तीर्ण. |
| ५. | पहारेकरी | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्ष इयात्ता ७ वी उर्त्तीर्ण. |
| ६. | सफाईगार | अ) प्रकृतीने सुदृढ असावा. |

| वयोमर्यादा १ ते ६ करीता |
|---|
| उमेदवाराची सर्वसाधारण वयोमर्यादा ही कमीत कमी १८ पुर्ण व ४५ पेक्षा जास्त नसावी. |
| प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,<br>जिल्हा न्यायालय, पुणे. |

(२१/७/२५)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| परिशिष्ट २ | |
|---|---|
| **कार्यसूची** | |
| जिल्हा न्यायालय, पुणे यांचे आखत्यारीमधील तालुका न्यायालय करीता (वाहन चालक, परिरक्षक, पुस्तक बांधणीका, शिपाई, पहारेकरी, सफाईगार इ.) एकूण ६९ पदासाठी कराव्या लागणा—या कार्याची कार्यसूची ही आस्थापना विभाग, जिल्हा न्यायालय, पुणे यांचेकडून सादर करण्यात आलेल्या कार्यसूची प्रमाणे पुढील प्रमाणे | |
| **अ.क्र.** | **१. वाहनचालक कार्यसूची** |
| १. | न्यायिक अधिकारी यांना निवासस्थानातून कार्यालयात व न्यायिक अधिकाऱ्यांचे कामकाज संपल्यानंतर त्यांना कार्यालयातुन निवासस्थानी ने — आण करणे. |
| २. | न्यायिक अधिकारी, प्रबंधक, अधिक्षक, सहायक अधिक्षक व वरिष्ठांच्या आदेशानुसार त्यांना कारागृह, ग्राम न्यायालय, बाल अनाथआश्रम येथे भेटीसाठी ने — आण करणे. |
| ३. | राजशिष्टाराच्या कामकाजासाठी आदरणीय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, मा. नाम. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती यांना संबंधित वरिष्ठांच्या आदेशानुसार पुणे विमानतळ, रेल्वे स्थानक तसेच शासकीय विश्रामगृहापासून इच्छित कार्यक्रमासाठी ने — आण करणे. |
| ४. | न्यायालयात जमा झालेला दंड, शिक्षेसंदर्भातील रक्कम तसेच इतर शासकीय भरणा कोषागारमध्ये जमा करण्याच्या कामकाजाकरीता नेमणूक झालेल्या बेलिफ यांना ने — आण करणे. |
| ५. | विधी सेवा प्राधिकरण, पुणे येथील राष्ट्रीय लोकअदालतीच्या तसेच इतर शासकीय कामकाजाकरीता संबंधीत न्यायाधीशांना पुणे जिल्हयाच्या न्यायिक आस्थापनेवरील सर्व तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या न्यायालयात भेट देणेकामी ने — आण करणे. |
| ६. | मंत्रालय, नाम. उच्च न्यायालय, मुंबई, महालेखापाल मुंबई या कार्यालयांमध्ये टपालाची ने — आण करणे. |
| ७. | वरिष्ठांच्या आदेशानुसार शासकीय कामकाजासाठी तातडीने शासकीय वाहन इच्छित स्थळी ने — आण करणे. |
| ८. | मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, मा. जिल्हा न्यायाधीश — १, मा. जिल्हा न्यायाधीश, पुणे केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सी.बी.आय), {विशेष न्यायालय}, मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांना शासनाने पुरविलेल्या शासकीय वाहन कार्यालयात, पुणे शहरात तसेच पुणे जिल्हयाच्या न्यायिक आस्थापनेवरील तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या न्यायालयात शासकीय तसेच तपासणीच्या कामकाजाकरीता ने — आण करणे. |
| ९. | नाम. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे न्यायिक आस्थापनेवरील विविध प्रकारच्या भरती प्रक्रियेकामी, न्यायीक आधिका—यांच्या परीषदेच्या शासकीय कामकाजाकरीता विविध ठिकाणी जाणेकरीता, परिषदेच्या ठिकाणी जाणेकरीता, वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे तसेच प्रबंधक अधीक्षक, सहा. अधिक्षक, सहायक कर्मचारी यांना परीषदेच्या ठिकाणी व परिक्षा केंद्रावर ने — आण करणे. ...१६ |

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| अ.क्र. | २. न्यायालयीन परिरक्षक कार्यसूची |
|---|---|
| १. | कोर्ट सुरु होण्यापूर्वी प्रत्येक दिवशी सकाळी कोर्टाची पाहणी करणे. |
| २. | कोर्ट व कोर्टाच्या आवारातील व न्यायालयाच्या आवारातील बागेमध्ये स्व:च्छता सफाई कामगारांमार्फत करुन घेणे. |
| ३. | कोर्ट रुम व कार्यालये व्यवस्थित आहे का नाही त्याची पाहणी करणे. |
| ४. | सार्वजनिक बांधकाम खात्याकडून जरुर पडल्यास किरकोळ दुरुस्त्या करुन घेणे. उदा. दरवाजे, खिडक्यांची मोडतोड झाली असल्यास त्यांची दुरुस्ती करुन घेणे. तसेच नळ दुरुस्ती इत्यादी. |
| ५. | कोर्ट कार्यालये व न्यायालयाच्या आवारातील विज यंत्रणा इलेक्ट्रीक सार्वजनिक बांधकाम खात्याने नेमूण दिलेल्या कामगारांमार्फत करुन घेणे. |
| ६. | कोर्ट व कोर्टाची कार्यालये व आवारात पाणी पुरवठा व्यवस्थित आहे की नाही ते पाहणे. |
| ७. | कोर्टाच्या आवारातील वेळप्रसंगी चोरी सारखे प्रकार झाल्यास त्यासबंधी रितसर फिर्याद दाखल करणे व वरिष्ठ अधिका—यांना कळविणे. |
| ८. | वरिष्ठांकडून सांगितलेल्या कामाची योग्य ती पुर्तता करणे. (उच्च न्यायालयाचे न्यायाधिश सो भेट) त्या व्यतिरिक्त जिल्हा न्यायाधीश सांगतील त्याप्रमाणे कामाची पुर्तता करणे. |
| ९. | कोर्ट आवारात नेमलेले पहारेकरी हजर आहे की नाही याची पहाणी व चौकशी करणे. |
| १०. | सुट्टीच्यापूर्वी न्यायालयीन परिरक्षक यांनी सुट्टीच्या कालावधीतील पहारेकरी यांची पर्यायी व्यवस्था करणे. |
| ११. | न्यायालयाच्या मुख्य इमारतीवर रोज वेळेत राष्ट्रध्वज पूर्ण सन्मानाने चढवणे व उतरवणे याकडे काटेकोरपणे लक्ष देणे. |
| १२. | वर नमुद केलेल्या कामकाजाचा अहवाल दर आठवड्याला मा. प्रमुख जिल्हा न्यायालय, पुणे यांना सादर करणे. |

| अ.क्र. | ३. पुस्तक बांधणीकार कार्यसूची |
|---|---|
| १. | कायद्याच्या १२ मंथली अंकाचे प्रत्येक पान वेगवेगळे करणे व अनुक्रमणिकेसह सदर पानांवर नंबर लिहून निटनिटके, टिकाऊ बांधणी करणे. |
| २. | अभिलेख कक्षातील आर. आर. यादी, जुना दस्तावेज नोंदवही, पावतीपुस्तके, खातेअंतर्गत निम्नस्तरीय व उच्चस्तरीय परीक्षा तसेच भरती प्रक्रियेच्यावेळी मागणीनुसार बांधणीसंदर्भातील कामकाज करणे. |
| ३. | न्यायालयच्या ग्रंथालयातील, न्यायिक अधिकाऱ्यांच्या न्यायालयातील व निवास्थानातील शासकीय पुस्तकांची मागणीनुसार बांधणी करणे. |
| ४. | न्यायालयाच्या अभिलेख शाखेतील पेपर बुक, बारनिशी नोंदवही, टपाल वही, तसेच फेरीस्तांची मागणीनुसार बांधणी करणे. |
| ५. | न्यायालयातील तांत्रिक शाखा येथील उच्च न्यायालयात अग्रेषित करणेकामीच्या याचिका (Writ) तसेच दिवाणी दाव व फौजदारी खटल्यांच्या याचिकांची (Writ) च्या नोंदवहीची बांधणी करणे. |

..१७

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| | |
|---|---|
| ६. | जिल्हा न्यायालयाच्या अधिनस्त शासकीय ग्रंथालयातील विभागातील सर्व पुस्तके डी.एम.सी, एम.एल.जे., ए.आय.आर., क्रिमीनल लॉ जनरल इ. पुस्तकांची मागणीनुसार बांधणी करुन देणे. |
| ७. | सर्व न्यायालयातील शासकीय पावती पुस्तके, बारनिशी नोंदवही, टपाल वही, टपाल नोंदवही, नविन नोंदवह्या, न्यायाधिशांचे न्यायनिर्णय व इतर सर्व संबंधीत शासकीय लेखन सामुग्रीची मागणीनुसार बांधणी करुन देणे. |
| ८. | जिल्हा न्यायालयाच्या अंतर्गत तांत्रिक शाखेच्या अधिनस्त सांख्यिकी कार्यासनाशी संबंधित मासिक, चौमाही, सहामाही विवरणपत्रांची, गोपनीय अहवालांच्या संचाची, न्यायालयातील कोषागार नोंवहीची मागणीनुसार बांधणी करुन देणे. |
| ९. | बेलिफ विभागातील कामगिरी मांडून देण्याची नोंदवही तसेच बेलिफांची नोंदवहीची बांधणी करुन देणे. |
| १०. | जिल्हा न्यायालयाच्या सर्वसाधारण शाखेतील मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे पुणे न्यायिक आस्थापनेवरील न्यायालयीन इमारतीच्या बांधकामाच्या चर्चेसंदर्भातील बैठकीच्या इतिवृत्तांच्या कागदपत्रांची बांधणी करणे |
| ११. | सर्व आस्थापनेसाठी न्यायानिर्णयाचे जजमेंट पेपर / झेरॉक्स पेपर ए–४, ए–३ या मापानुसार कापून देणे. |
| १२. | मा. न्यायिक अधिकारी व वरिष्ठांच्या निर्देशानुसार काम करणे. |

| अ.क्र. | **४. शिपाई कार्यसूची** |
|---|---|
| १. | कार्यालयात / न्यायालयात तसेच न्यायिक अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी असलेल्या कार्यालयातील साफसफाई करणे, स्वच्छता राखने. |
| २. | शिपायांच्या कार्यालयीन वेळेनुसार न्यायालय, कार्यालय उघडणे तसेच न्यायालयीन, कार्यालयीन कामकाज संपल्यानंतर ते बंद करणे. |
| ३. | मा. न्यायाधीश, प्रबंधक, अधिक्षक, सहायक अधिक्षक तसेच वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे काम करणे. |
| ४. | शिपायांची नेमणूक ज्या न्यायालयात, कार्यालयात केलेली आहे तेथील न्यायिक अधिकारी, कार्यालय प्रमुख सांगतील ते काम करणे, वकील, पक्षकार, पोलीस व इतर संबंधीत लोकांचा पुकारा करणे, टपाल वाटप करणे, मा. न्यायिक अधिकारी यांचे निजी कक्ष येथील झाडलोट, स्वच्छता इ. कामे करणे. तसेच मा. न्यायिक अधिकारी यांचे निवासस्थानात असलेल्या कार्यालयाशी संबंधीत सर्व कामे करणे. न्यायिक अधिकारी यांचे दप्तर निवासस्थानातून न्यायालयात तसेच न्यायालयातून निवासस्थानी ने – आण करणे. न्यायिक अधिकारी यांच्या निर्देशाप्रमाणे कामकाज करुन कर्तव्य पार पाडणे. |
| ५. | न्यायिक अधिकारी, वरिष्ठ, न्यायिक लिपीक व इतर कर्मचारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ६. | प्रकरणामधील अर्जाला लावलेले कोर्ट फी स्टॅम्पला पंच करणे व न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुचनेनुसार कार्यालयीन कामकाजात सहाय्य करणे. |
| ७. | न्यायिक अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या कामांची कर्तव्यपूर्ती व कार्यालयीन काम करणे. |
| ८. | न्यायिक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या इतर सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे. |

..१८

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

| | |
|---|---|
| ९. | न्यायिक अधिकाऱ्यांचे मुख्य प्रवेश द्वारापासून न्यायालयात आगमण झालेपासून ते न्यायालयातील त्यांच्या निजी कक्षापर्यंत ने – आण करणे, न्यायालयात न्यायासनावर ने – आण करणे. आवश्यकतेनुसार त्यांच्यामागे उभे राहणे, तसेच न्यायिक अधिकारी व न्यायालयातील कर्मचारी यांच्या आज्ञेनुसार खटले, दावे व इतर संचिका तसेच कागदपत्रे संबंधीतांकडून घेउन वरिष्ठांसमोर सादर करणे. |
| १०. | न्यायिक अधिकऱ्यांच्या निवासस्थानात असलेल्या कार्यालयात कर्तव्याचे पालन करताना न्यायिक अधिकारी यांनी सांगितलेली कामे दक्षतापूर्वक पार पाडणे. |
| ११. | न्यायालयीन कर्मचारी यांचे सूचनेनुसार निकाली प्रकरणातील व इतर कागदपत्रे यांचे फाडकाम करणे. |
| १२. | न्यायालयातील प्रकरणे एका न्यायालयातुन दुसऱ्या न्यायालयाकडे वर्ग झालेनंतर ती संबंधीत न्यायालयात नेउन देणे, तसेच न्यायिक अधिकारी न्यायालयातील न्यायासनावर कामकाज करणेसाठी बसल्यानंतर न्यायिक अधिकारी व न्यायालयातील वरिष्ठ कर्मचारी यांचे आदेशानुसार काम करावे. |

| अ.क्र. | ५. सफाईगार कार्यसूची |
|---|---|
| १. | न्यायालयीन आवारातील साफसफाई करणे. |
| २. | न्यायालयीन इमारतींच्या आवारातील कचरा तसेच न्यायालयाच्या अवारमध्ये असलेल्या बागेमधील कचरा गोळा करुन तो पुणे म.न.पा च्या कचरा गाडीमध्ये टाकणे. |
| ३. | न्यायालयातील सर्व न्यायाधीशांची निजी कक्षातील स्वच्छतागृहे साफसफाई करणे. |
| ४. | न्यायालयातील सर्व महिला व पुरुषांची सार्वजनिक स्वच्छतागृहांची साफसफाई करणे. |
| ५. | न्यायालयाच्या आवारातील, इमारतींच्या बाहेरच्या आवारातील फरशी पुसणे, जाळी जरमाटे काढणे, तसेच पायऱ्यांची साफसफाई करणे. |
| ६. | मा. न्यायिक अधिकारी, अधिक्षक, सहायक अधिक्षक, न्यायालयीन परिरक्षक तसेच वरिष्ठांच्या निर्देशानुसार काम करणे. |

| अ.क्र. | ६. पहारेकरी कार्यसूची |
|---|---|
| १. | न्यायालयीन ईमारत आणि त्या परिसरातील सरकारी मालमत्ता यांची सुरक्षा करणे. |
| २. | न्यायालयीन आवारात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींच्या हालचालीवर लक्ष ठेवणे व संशयास्पद वाटल्यास वरिष्ठांना सुचित करणे. |
| ३. | मा. न्यायाधीश, प्रबंधक, अधिक्षक, सहायक अधिक्षक, न्यायालयीन परिरक्षक तसेच वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे काम करणे. |
| ४. | न्यायिक अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या इतर सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे. |

२/१०/१६

प्रबंधक,

जिल्हा न्यायालय, पुणे.

# (रु. ५००/— स्टॅम्प पेपरवर हमीपत्र)

## हमीपत्र

मी, श्री. ——————————————————, प्रो. प्रा. ———————————— ————————एंटरप्रायजेस, पत्ता, ——————————————, संस्थेचा नोंदणी क्रमांक —————————————, संस्थेचा दुरध्वनी क्रमांक ——————————, याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहिर करण्यात आलेल्या आउटसोर्सिंगचे त—त्वांवर बाहय यंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने भरावयाची वाहन चालक, न्यायालय परिरक्षक, पुस्तक बांधणीकार, शिपाई, पहारेकरी, सफाईगार पदांच्या कामाची निविदा भरताना निविदा अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेली सर्व माहिती चे अवलोकन केलेल आहे व आपल्या कांर्यालयातील कामाची माहीती करुन त्यानुसार निविदा भरली आहे. तसेच मी सदर कामासाठीच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करीन.

आपल्या कार्यालयालाने सदर सेवासाठी निर्गमित केलेला निर्देशन आमचे कंपनीस बंधनकारक राहतील.

ठिकाण : पुणे स्वाक्षरी :—

दिनांक : / / पुरवठादाराचे नांव पत्ता शिक्यासह :—

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.